# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 11/06/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा कचारी सावंगाा जामनदी प्रकल्पाचे पात्र येथे दिनांक 10/06/2020 चे 09.30 वा. ते 18.30 वा. दरम्यान 1) यश दिलीप वाघाडे, वय 09 वर्ष व 2) राजेश मारोती युवनाते, वय 09 वर्ष, दोन्ही रा. कचारी सावंगा हे दोघेही जाम नदीचे प्रकल्पावर पोहण्याकरीता गेले असता पोहता न आल्याने प्रकल्पाचे पात्रात पाण्यात बुडुन त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिलीप शंकररावजी वाघाडे, वय 45 वर्ष, रा. कचारी सावंगा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई नितेश डोकीरमारे 9545210273 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा कन्हान नदीचे पात्र वलनी येथे दिनांक 10/06/2020 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान जय दिलीप वर्मा, वय 15 वर्ष, रा. वलनी हा त्याचे मित्रान सह कन्हान नदीवर आंघोळ करण्याकरिता गेला होता. दरम्यान पोहतांना तो खोल पाण्यामध्ये डुबल्याने त्यास बाहेर काढुन वलनी वेकोली हॉस्पीटल येथे नेले असता तेथे डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना रविन्द्र रोहनकर, पो. स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ नामदेव धांडे 9764401246 हे करीत आहे.

3) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर मौजा सिंदेवानी येथे दिनांक 08/06/2020 चे 00.15 वा. दरम्यान गुरूदेव हिरामण भलावी, वय 17 वर्ष, रा. सिंदेवानी हा आपल्या मोबाईल वर टिकटोक पाहत असतांना वडीलाने हटकले की, "शेतात जावून काम करत जा, मोबाईल वर खेळत नको जावू" असे म्हटले असता गुरूदेव भलावी याने रागाच्या भरात विषारी औषध प्राशन केले. उपचाकरीता त्यास प्रथम सरकारी दवाखाना देवलापार व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन दि. 08/06/2020 चे 00.15 वा. मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक संजय दाभाडे, मेयो पोलीस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पुंजरवाड 7775092593 हे करीत आहे.

4) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत तहसिल कार्यालय ऐरीकेशन ऑफिस जवळ ता सावनेर येथे दिनांक 10/06/2020 चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादींचे वडील नामे– धनराज शामराव देवरकर(मृतक), वय 60 वर्ष, रा. नांदागोमुख हे तहसील कार्यालय सावनेर येथे कामानिमित्य गेले असता काम करून घरी परत जात असतांना रोडवरील झाड फिर्यादिचे वडिलाचे अंगावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश्वर धनराज देवरकर, वय 31 वर्ष, रा. नांदागोमुख ता सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवा नारायण बोरकर 99823581297 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर